# मराठी भाषा आणि साहित्य विभाग

## वार्षिक अहवाल २०१९-२०

इस्माईल युसूफ महाविद्यालयातील मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळातर्फे शैक्षणिक वर्ष २०१९-२० ह्या वर्षात अनेक अभ्यास पूरक उपक्रम राबविण्यात आले. मराठी वाङ्मय मंडळ दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम, स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन करीत असते.मराठी वाङ्मय मंडळातर्फे, दिनांक ०१/०१/२०२० ते १५/०१/२०२० ह्या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा', 'शिक्षक दिन'(५ सप्टेंबर २०१९) तसेच दिनांक २७ फेब्रुवारी २०२० रोजी 'मराठी भाषा गौरव दिन ' साजरा करण्यात आला.

- **मराठी हस्ताक्षर स्पर्धा :**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मराठी हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन गुरुवार, दिनांक ०९/०१/२०२० रोजी सकाळी १०.३० वाजता करण्यात आले होते. ह्या उपक्रमात एकूण २२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

- **निबंध स्पर्धा :**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन शुक्रवार, दिनांक १०/०१/२०२० रोजी सकाळी ०९.३० वाजता करण्यात आले होते. प्रस्तुत निबंध स्पर्धेत मराठी भाषेसंदर्भातील विविध विषयांवरील निबंध विद्यार्थ्यांनी लिहिले . ह्या निबंध स्पर्धेत एकूण १७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला .

- **ग्रंथपरीक्षण स्पर्धा :**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथ परीक्षण स्पर्धेचे आयोजन शनिवार,दिनांक ११/०१/२०२०रोजी सकाळी ०९.३०वाजता करण्यात आले होते. ह्या उपक्रमात एकूण १६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला .

- **काव्य रसग्रहण स्पर्धा :**

मराठी भाषासंवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काव्य रसग्रहण स्पर्धेचे आयोजन सोमवार, दिनांक १३/०१/२०२० रोजी सकाळी ०९.३० वाजता करण्यात आले होते. ह्या उपक्रमात एकूण १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला .

- **सर्जनशील लेखन स्पर्धा :**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सर्जनशील लेखन स्पर्धेचे आयोजन मंगळवार, दिनांक १४/०१/२०२० रोजी सकाळी १०.३० वाजता करण्यात आले होते. ह्या उपक्रमात एकूण १० विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता आणि कथा लिहून सहभाग नोंदवला.

➢ **काव्यवाचन**:

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काव्यवाचन उपक्रमाचे आयोजन बुधवार,दिनांक १५/०१/२०२०रोजी सकाळी ०९.३० भाषाभवन येथे करण्यात आले होते. प्रस्तुत काव्यवाचन उपक्रमात मराठी भाषेतील विविध विषयांवरील कविता विद्यार्थ्यांनी सादर केल्या. ह्या काव्यवाचन उपक्रमात एकूण ०८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

➢ **रामकृष्ण मिशन भेट:**

मराठी विभागातर्फे स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त विभागातील विद्यार्थ्यांसाठी सोमवार,दिनांक १३ जानेवारी २०२० रोजी रामकृष्ण मठ, खार रोड ह्या ठिकाणी भेट देण्यात आली.ह्या भेटी दरम्यान एकूण १३ विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद ह्यांचे राष्ट्र उभारणीचे कार्य जाणून घेतले.

➢ **मराठी भाषा गौरव दिन :**

मराठी विभागातर्फे गुरूवार,दिनांक २७ फेब्रुवारी २०२० रोजी कवी कुसुमाग्रज जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले होते . ह्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री. मयुरेश शिर्के(प्रसिद्ध नभोवाणी निवेदक, रेडिओ जॉकी) ह्यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. माधुरी जोशी(हिंदी विभाग प्रमुख) ह्यांनी भूषविले. ह्याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन आणि कवी कुसुमाग्रज ह्यांच्याबद्दल मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. ह्याप्रसंगी प्रमुख अतिथींच्या हस्ते मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक आणि प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शीतल पांचीकर ह्यांनी केले,तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन डॉ. एकनाथ फुटाणे ह्यांनी केले..ह्या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी ह्यांची आवर्जून उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्वाती वाव्हळ ह्यांचे मार्गदर्शन लाभले.

➢ **मराठी विभाग (कनिष्ठ महाविद्यालय):**

महाविद्यालयात कनिष्ठ विभागातील शिक्षिका प्रा.लाजवंती चव्हाण ह्यांच्या पुढाकाराने कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी योग स्पर्धा, भाषांतर स्पर्धा, व्यंगचित्र स्पर्धा,शब्दकोडे स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा,निबंध स्पर्धा आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.विभागात विद्यार्थ्यांसाठी गुरुपौर्णिमा, अण्णा भाऊ साठे जयंती, मैत्री दिन,शिक्षक दिन, वाचन प्रेरणा दिन आदी दिवस साजरे करण्यात आले. कनिष्ठ विभागातील शिक्षिका प्रा.रेवती जाधव–राणे ह्यांचा 'ओंजळ' हा कवितासंग्रह ३० नोव्हेंबर २०१९ रोजी प्रसिद्ध झाला.

राकेश मोरे,हना बेग, सय्यद गौस, ओमकेश लहांगे, निलेश खताते, साईली यादव, गितेश भोसले, काजल म्हसकर, अनिकेत ताजणे, वैभव गवई , प्रज्ञा जांभळे, श्रुती दिवटे, आदी विद्यार्थ्यांचा वाङ्मय मंडळाच्या कार्यक्रमात उत्तम सहभाग राहिला.

**प्रा. समीर रामचंद्र वैरागी**
**मराठी विभाग प्रमुख**

## मराठी भाषा गौरव दिनाची क्षणचित्रे















**।।मराठी असे आमुची मायबोली।।**

- **‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा ’ अंतर्गत आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचे निकाल (०१ जानेवारी २०२० ते १५ जानेवारी २०२०)**

**१.मराठी हस्ताक्षर स्पर्धा**

- राकेश नारायण मोरे – तृतीय वर्ष कला

**२.मराठी निबंध स्पर्धा**

- शिवराज लक्ष्मण रायगोंडे – द्वितीय वर्ष कला

**३.ग्रंथपरीक्षण स्पर्धा**

- लता कैलास सुरवाडे – प्रथम वर्ष कला

**४.कविता रसग्रहण स्पर्धा**

- निलेश गणेश खताते – तृतीय वर्ष कला

**५.सर्जनशील लेखन स्पर्धा**

- काजल सुभाष म्हसकर – तृतीय वर्ष कला

**६.काव्यवाचन स्पर्धा**

- साईली सहदेव यादव – तृतीय वर्ष कला

- **तृतीय वर्ष कला (मराठी) विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी ( शैक्षणिक वर्ष २०१८-१९ )**
- **प्रथम क्रमांक** – नेहा सुबोधचंद्र कदम
- **द्वितीय क्रमांक** – तेजल विलास बाईंग
- **तृतीय क्रमांक**–दुशांत शिवाजी लोकरे

**प्रा. समीर रामचंद्र वैरागी**

**मराठी विभागप्रमुख**




